# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

:: चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र ::

Date : 01.07.2025



: 07172-264300 : 07172-255800 : 7447744100 (PRO)


## चंद्रपूर जिल्हा पोलीस अभिलेखावरील

## चोरी, जबरी चोरी, खुन खुनाचा प्रयत्न करणारा सराईत गुन्हेगार व्यक्ती संगम संभाजी सागोरे

# यास एमपीडीए कायदा अंतर्गत चंद्रपूर पोलीसांचा दणका

चंद्रपूर जिल्हा पोलीस अभिलेखावरील धोकादायक व्यक्ती चोरी, जबरी चोरी, दुखापत करणारा व्यक्ती नामे संगम संभाजी सागोरे वय ३० वर्ष रा. मित्र नगर आंबेडकर कॉलेज जवळ, चंद्रपूर यांचेवर पो. स्टे. बल्लारशा, रामनगर, पडोली, भद्रावती येथे जबरी चोरी, अग्निशस्त्र, जाळपोळ व अश्लिल शब्दात शिवीगाळ, खुन, खुनाचा प्रयत्न करणे असे एकुण २१ गुन्हे दाखल असुन त्याची परीसरामध्ये दहशत आहे. त्याने सामान्य जनते मध्ये दहशत निर्माण केली असुन त्याने गुन्हेगारी कारवाया चालुच ठेवल्याने त्याचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करून सुध्दा आरोपी कायदयाला जुमानत नसल्याने याची दखल घेवुन सदर इसमावर महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती दृकश्राव्य कलाकृती विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीयो पारेट्स) वाळु तस्कर अत्यावश्यक वस्तुचा काळा बाजार करणारी व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याविषयीचा अधिनियम सन १९८१ (सुधारणा २००९, २०१५) अन्वये प्रस्ताव तयार करून श्री. विनय गौडा जि. सि. भा.प्र.से., जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचेकडे सादर केला असता, त्यांनी सदर प्रस्तावाची दखल घेवुन प्रस्तावित इसम नामे संगम संभाजी सागोरे वय ३० वर्ष रा. मित्र नगर आंबेडकर कॉलेज जवळ, चंद्रपूर यास नमुद कायदयांतर्गत १ वर्षा करीता स्थानबध्द करण्याबाबत दिनांक ३०/०६/२०२५ रोजी आदेश पारीत केल्याने त्यास मध्यवर्ती कारागृह चंद्रपूर येथे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, चंद्रपूर श्री. मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपूर, रिना जनबंधू यांचे मार्गदर्शनात सुधाकर यादव, उविपोअधि, चंद्रपूर, नयोमी साटम, सहायक पोलीस अधीक्षक तथा उविपोअधि, वरोरा, अमोल काचोरे, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. चंद्रपूर तसेच ठाणेदार पो. स्टे. रामनगर, आसीफराजा शेख, पो.उपनि. उपरे, पो. कॉ. अनिल जमकातन, स्थागुशा चंद्रपूर, पथकातील सपोनि योगेश खरसान, स.फौ. अरून खारकर, पोहवा सुधिर मत्ते, पोहवा परीवरीश शेख यांनी मोलाची कारवाई केली आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर
:: चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र ::
Date : 01.07.2025


: 07172-264300 : 07172-255800 : 7447744100 (PRO)


# देशी बनावटीचे अग्निशस्त्र व दारुगोळा
# अवैधरित्या बाळगणारे इसमास अटक
# पोलीस स्टेशन मुल ची कामगिरी

दिनांक ३०/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन मुल डिबी पथक पोलीस स्टेशन मुल हृददीत पेट्रोलीग करीत असतांना वेळ १६:१५ वा दरम्यान महाबिज केंद्र जवळ, मुल ते ताडाळा रोडवर, मुल येथे आरोपी गौरव नितीन नरूले वय २६ वर्ष, रा वार्ड क १२ मुल ता मुल जि चंद्रपुर हा त्याचे ताब्यातील मोटार सायकल सह संशयीतरित्या मनाई केलेले एक देशी बनावटीचे लोखंडी अग्नीशस्त्र (पिस्टल), दोन जिवंत दारूगोळा (काडतुस), दोन मॅगझीन विनापरवाना बेकायदेशीर व अवैध्यरित्या अग्निशस्त्रासह लोकांना धाक दाखविण्याचा व आपली दहशत निर्माण करून मानवीय जिवीतास व त्यांचे वैक्तीगत सुरक्षीततेला धोका निर्माण होण्याच्या उददेशाने भविष्यात गंभीर स्वरूपाचा दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत असतांना मिळुन आला. त्याच्या कडुन देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल, लोखंडी मॅग्झीन सह किंमत ४०,०००/– , दोन जिवंत काडतुस किंमत १०००/–, एक लोखंडी धातुची मॅग्झीन कि. २०००/–, एक जुना वापरता मोबाईल कि. १०,०००/–, एक बजाज पल्सर मोटार सायकल कि. ६०,०००/– असा एकुण १,३०,०००/– रू. चा माल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन मुल येथे अप क २३५ / २०२५, कलम ३/२५, ७/२५ भारतीय शस्त्र अधिनीयम १९५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन आरोपीस अटक करण्यात आली आहे व पुढील तपास सपोनि अमितकुमार आत्राम पो स्टे मुल हे करीत आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, चंद्रपूर श्री. मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपूर, रिना जनबंधू यांचे मार्गदर्शनात सुधाकर यादव, उविपोअधि, चंद्रपूर तथा मुल यांच्या मार्गदर्शनात सपोनी सुबोध वंजारी यांच्या नेतृत्वात सपोनी अमितकुमार आत्राम, पोउपनी भाऊराव बोरकर, पो.हवा जमिर खान पठाण, भोजराज मुंडरे, पोअं. चिमाजी देवकते, नरेश कोडापे, पंकज बगडे, शंकर बोरसरे सर्व पोस्टे, मुल यांनी केली आहे.